# एक साधे जीवन

नको मला ते सोने-नाणे
सूर्य नभी तळपे तेजाने
बरसे अखंड सुवर्ण किरणे
उधळण करतो मुक्त मनाने

नकोच मज ते माणिक मोती
नजरेस हिरवा शालू प्रभाती
जाईन तेथे अलगद मिळती
पर्णांवर दवबिंदूंचे मोती

नकोच मज ते ग्रंथ अचेतन
पक्ष्यांचे ते सुमधुर गुंजन
उच्च रवाने करतिल वाचन
हर्षयुक्त त्यां स्वरांत गायन

नकोच मज ती निसर्गचित्रे
शुभ्र मेघ आकाशी विहरे
अन नयनांना सुखावणारे
क्षणोक्षणी नवचित्र चितारे

नकोच मज ती धुंद वारुणी
पितो झऱ्याचे निर्मळ पाणी
कानी गुंजे झुळझुळ वाणी
हीच नशा स्वर बनते गाणी

वस्त्र भरजरी नकोच मज ते
साधे श्वापद शिकवुन जाते
अल्प ठेवुनि गरजा अपुल्या
आनंदाने जगता येते!

A Plain Life by William Henry Davies
Translation by Abhay B. Joshi and Milind A. Toro